भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/११/२०१७

## प्रेसनोट

## " विज चोरीचे गुन्हयात आरोपीस सहा महिणे कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

**भंडारा** :– भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत मौजा मोहघाटा येथील नामे मार्तंड रामा रामटेके याने आपल्या घरासमोरून जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे विद्युत तारेवरून विज प्रवाह कुठल्याही परवानगी विना आपले घरात विज घेवुन अनाधीकृतपणे विजेचा वापर करत असल्या बाबत व आज पर्यत किमती ५,०००/रुपयाची विज चोरी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी उपविभाग एकोडी येथुन केल्याबाबत येथील कनिष्ठ अभियंता श्री. रविद्र अशोक कापगते यांनी दिनांक १९/०४/२०१५ रोजी दिलेल्या तक्रारी वरून पोलीस स्टेशन साकोली येथे अपराध क्र. ४०/२०१५ कलम १३५ भारतीय विद्युत कायदा सहकलम ३७९ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक दिलीप चुटे यांनी सुरु केला व गुन्हयात **आरोपी नामे मार्तंड रामा रामटेके वय ६० वर्ष, रा. मोहघाटा** याचे विरूध्द गुन्हयाचा तपास करून आरोपी विरूध्द जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा येथे दोषारोप पत्र दाखल केले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. सत्र न्यायाधीश श्री. भंसाली साहेब** यांचे समक्ष चालली. गुन्हयात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्त्या दुर्गा मलतले, यांनी योग्य साक्षदारांची पडताळणी करुन बाजु मांडली. आज दिनांक ०३/११/२०१७ रोजी गुन्हयात **आरोपी नामे मार्तंड रामा रामटेके वय ६० वर्ष, रा. मोहघाटा** यास भां.दं.वि. कलम १३५ अन्वये दोषी ठरवुन **सहा महीणे कारावास व १२,०००/—रुपये दंडाची शिक्षा सुनावली**. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक,रामेश्वर पिपरेवार यांचे मार्गदर्शनात पो. हवा.विनोद बघेले बं. नं. २७ पो. स्टे. साकोली यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**(कृपया समोरच्या पहील्या पानावर देण्यास विनंती)**

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीताच